महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१ Email ID directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध//527/2021 दि: 15-02-2021

प्रति,

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व)

**विषय:**- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत गवंडी प्रशिक्षणासाठी लाभधारकांची, गावांची व प्रशिक्षणार्थी गवंडी यांचे सुधारित उद्दिष्ट

**संदर्भ** :- 1. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. बांध 348/2019 दि. 23.05.2019
2. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, यांचे प्र.क्र.M-12016/19/2016-RH (M&T) दि. 03.02.2021

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत मजबूत व दर्जेदार पक्की घरे निर्माण करताना ग्रामीण भागामध्ये पुरेशा प्रमाणात कुशल गवंडी उपलब्ध व्हावेत या हेतूने केंद्र शासनाने योजनेअंतर्गत गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याविषयी आदेशित केलेले आहे. महाराष्ट्र राज्यास मागील पाच वर्षासाठी (सन 2016-17 ते 2020-21) एकूण 33,407 गवंडी प्रशिक्षणाचे उद्दिष्ट प्राप्त झालेले आहे. सदरील कामासाठी योजनेतील प्रशासकीय खर्च निधीतील 0.8 टक्के निधी राखून ठेवण्या बाबत सुचना आहेत. मागील 5 वर्षात प्राप्त झालेले गवंडी प्रशिक्षणाचे उद्दिष्ट व जिल्हानिहाय, तालुकानिहाय मागील पाच वर्षातील घरकुलांचे उद्दिष्ट यांची सांगड घालून संदीर्भ पत्राव्दारे तालुकानिहाय, जिल्हानिहाय गवंडी प्रशिक्षण अंतर्गत बांधावयाची घरकुल संख्या, गवंडी प्रशिक्षण घेण्यात येणाऱ्या गावांची संख्या व प्रशिक्षणार्थी गवंडीची संख्या निश्चित करून कळविण्यात आलेले आहे.

मात्र केंद्र शासनाने दिलेल्या भौतिक उदिदष्टानुसार आर्थिक उदिदष्ट सुसंगत नसल्यामुळे संदर्भिय 2 अन्वये केंद्र शासनाने कळविलेले आर्थिक उदिदष्ट लक्षात घेऊन गवंडी प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय, तालुकानिहाय सुधारित उद्दिष्ट निश्चित करण्यात येत आहे. यापूर्वी गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेले गवंडी प्रशिक्षणातील घरकुले, प्रशिक्षणार्थी गवंडी यांची सांगड घालून

Scanned with CamScanner

जिल्हानिहाय, सुधारित गवंडी प्रशिक्षणाचे उद्दिष्ट या पत्रासोबत 'विवरणपत्र अ' मध्ये क्र 1 अन्वये देण्यात येत आहे. संदर्भ पत्राव्दारे देण्यात आलेले जिल्हानिहाय, गवंडी प्रशिक्षणाचे उद्दिष्ट अधिक्रमित करण्यात येत आहे.

मात्र संदर्भ 1 च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे इतर बाबी यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या बाबीची नोंद घेऊन सर्व जिल्ह्यांनी तात्काळ कार्यवाही करावी. तसेच गवंडी प्रशिक्षणाचे 2016-17 ते 2020-21 या आर्थिक वर्षातील उद्दिष्ट पुर्ण झाले असल्याने यापुढे गवंडी प्रशिक्षणासाठी कोणताही नवीन प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात येऊ नये.

करिता माहिती व तात्काळ कार्यवाहीस्तव.

(डॉ. राजाराम दिघे)
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

सोबत: वरील प्रमाणे

प्रतिलिपी:

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. उपायुक्त विकास, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहितीस्तव
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीस्तव.

Scanned with CamScanner

# विवरणपत्र — अ

| SR. NO | NAME OF DISTRICT | PREVIOUSLY FIXED TARGET | | REVISED TARGET | |
|---|---|---|---|---|---|
| | | TRAINY MASONS | GHARKUL | TRAINY MASONS | GHARKUL |
| 1 | AHMEDNAGAR | 1590 | 318 | 975 | 195 |
| 2 | AKOLA | 1410 | 282 | 280 | 56 |
| 3 | AMRAVATI | 2585 | 517 | 905 | 181 |
| 4 | AURANGABAD | 760 | 152 | 760 | 152 |
| 5 | BEED | 620 | 124 | 185 | 37 |
| 6 | BHANDARA | 1170 | 234 | 300 | 60 |
| 7 | BULDHANA | 1070 | 214 | 910 | 182 |
| 8 | CHANDRAPUR | 1020 | 204 | 295 | 59 |
| 9 | DHULE | 1300 | 260 | 850 | 170 |
| 10 | GADCHIROLI | 765 | 153 | 430 | 86 |
| 11 | GONDIA | 1560 | 312 | 600 | 120 |
| 12 | HINGOLI | 395 | 79 | 365 | 73 |
| 13 | JALGAON | 1895 | 379 | 830 | 166 |
| 14 | JALNA | 450 | 90 | 195 | 39 |
| 15 | KOLHAPUR | 630 | 126 | 590 | 118 |
| 16 | LATUR | 480 | 96 | 225 | 45 |
| 17 | NAGPUR | 1210 | 242 | 790 | 158 |
| 18 | NANDED | 1495 | 299 | 100 | 20 |
| 19 | NANDURBAR | 2862 | 572 | 1465 | 293 |
| 20 | NASHIK | 2145 | 429 | 2010 | 402 |
| 21 | OSMANABAD | 270 | 54 | 330 | 66 |
| 22 | PALGHAR | 1100 | 220 | 600 | 120 |
| 23 | PARBHANI | 275 | 55 | 425 | 85 |
| 24 | PUNE | 675 | 135 | 750 | 150 |
| 25 | RAIGAD | 375 | 75 | 195 | 39 |
| 26 | RATNAGIRI | 225 | 45 | 20 | 4 |
| 27 | SANGLI | 585 | 117 | 165 | 33 |
| 28 | SATARA | 500 | 100 | 560 | 112 |
| 29 | SINDHUDURG | 165 | 33 | 210 | 42 |
| 30 | SOLAPUR | 1170 | 234 | 435 | 87 |
| 31 | THANE | 345 | 69 | 210 | 42 |
| 32 | WARDHA | 495 | 99 | 180 | 36 |
| 33 | WASHIM | 420 | 84 | 345 | 69 |
| 34 | YAVATMAL | 1395 | 279 | 740 | 148 |
| | **TOTAL** | **33407** | **6681** | **18225** | **3645** |

Table title: TARGET SETTING AS PER NEW TARGET [18225] FOR MASON TRAINING

संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष
ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

Scanned with CamScanner